# न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ११ माहे मे, २०२३)

अभियोग पक्षांने सादर केलेला मौखिक व कागदोपत्री पुरावा यांचे एकत्रितपणे काळजीपूर्वक अवलोकन केले असता खालील निर्णय प्रश्न उपस्थित झाले. त्या निर्णय प्रश्नाचे कारणासहीत निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| अ.क्र. | निर्णय प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय, की आरोपीने विनापरवाना बेकायदेशीररित्या गावठी दारु २५ लिटर अंदाजे किंमत रू. १३००/– बाळगून महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये अपराध केला? | शाबीत झाले नाही. |
| २ | प्रस्तूत खटल्याचे कामी अंतीम काय आदेश निर्गमित केले आहेत? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## कारणमिमांसा

०७. आरोपीने सदरचे अपराधाचे कृत्य केले आहे याच्या शाबीतीसाठी अभियोग पक्षाने खबरी प्रविण राजाराम हटकर (सा.क्र.२) व तपासिक अमलदार शिवाजी पंडीतराव पाटील (सा.क्र.१) यांची साक्ष नोंदविली. अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा नि.क्र.१४, रासायनिक विश्लेषण अहवाल नि.क्र.१५, प्रथम खबर नि.क्र.१६, प्रथम खबर अहवाल नि.क्र.१७ या दस्तांवर भिस्त ठेवली. प्रस्तुत प्रकरणात जप्ती पंच, मुद्देमाल वाहक यांना वारंवार समन्स, जमानती व बिनजमानती अधिपत्र काढून हजर न झाल्यामुळे नि.क्र.१ खाली आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**निर्णय प्रश्न क्रमांक ०१ व ०२ बाबतः–**

०८. अभियोगपक्षाने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीच्या ताब्यात बेकायदेशीररित्या गावठी दारु २५ लिटर अंदाजे किंमत रू. १३००/– अवैधरित्या आढळुन आली. खबरी यांनी शपथेवर प्रथम खबर मधील मजकुराशी सुसंगत अशी साक्ष दिली आहे.

०९. तपासिक अमलदार शिवाजी पंडीतराव पाटील (सा.क्र.१) यांनी शपथेवर

असे कथन केले की, त्यांनी तपासादरम्यान जप्ती पंचनामा नि.क्र.१४ तयार करुन साक्षीदारांचे जबाब नोंदविले व रासायनिक विश्लेषण अहवालासह दोषारोप पत्र दाखल केले. तपासिक अमलदार यांची साक्ष औपचारीक स्वरुपाची असल्यामुळे त्यांच्या साक्षीदार विश्वास ठेवुन आरोपीचे अपराधाचे कृत्य शाबित होत नाही.

१०. अभियोगपक्षा मार्फत रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये, विश्लेषणकामी पाठविण्यात आलेल्या द्रावणामध्ये ९ टक्के ईथील अल्कोहोल असल्याचे व ते औषधी, प्रतीजैवीक वा निर्जंतुकीकरणाकरीता वापरले जाणारे द्रव्य नसल्याचे नमुद करण्यात आले आहे. परंतु, रासायनिक विश्लेषणाकामी पाठविण्यात आलेला मुददेमाल हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त केल्याबाबतचा ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. जप्त मुद्देमाल रासायनिक पृथकरण अहवालासाठी वैज्ञानिक प्रयोगशाळा, नाशिक येथे जमा करण्यात आला. तसेच, दिनांक १२.०४.२०२२ रोजी मुद्देमाल जप्त केल्यानंतर नमुना बाटली प्रयोग शाळेत दिनांक २९.०६.२०२२ रोजी जमा करण्यात आली. सदरील मुद्देमाल दरम्यानच्या काळात नमुना बाटली सुरक्षित ठिकाणी होती किंवा कसे, याबाबत पुरावा नाही. त्यामुळे, रासायनिक परिक्षण करताना नमुना बाटली सुरक्षित प्रयोगशाळेत प्राप्त झाली किंवा कसे, याबाबत शंका आहे. सबब, आरोपी गावठी दारु २५ लिटर बाळगुन विक्री करत असताना मिळुन आला असे म्हणता येत नाही. वरील विश्लेषण व कारणांचा विचार करता अभियोगपक्षाने आरोपीवरील आरोप संशयापलीकडे सिध्द केलेले नाहीत. सबब, आरोपीस संशयाचा फायदा देण्यात येतो व आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत असे माझे मत झाले आहे. म्हणुन मी निर्णय प्रश्न क्र.०१ चे उत्तर नकारार्थी देत आहे. यास्तव मी निर्णयप्रश्न ०२ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपीची फौजदारी व्यवहार संहिता कलम २५५ (१) मधील तरतुदीनुसार त्यांच्यावर निश्चित करण्यात आलेल्या महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात आले.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी रूपये ७५००/–चे वैयक्तिक बंधपत्र सादर करावे.

BHAKTI ANILRAO TALEKAR

ठिकाण:–एरंडोल.
दिनांक:– ११.०५.२०२३

( श्रीमती बी.ए.तळेकर )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, एरंडोल

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Order uploaded by | : | A.S.Puranik |
| Name of the Court | : | JMFC, Erandol. |
| Date of Judgment | : | 11.05.2023 |
| Judgment signed by the | : | B.A.Talekar |
| Presiding officer on | : | 11.05.2023 |
| Judgment uploaded on | : | 11.05.2023 |